# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/03/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## पोस्टे सावनेर हद्दीतील
## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची विक्री करणाऱ्या व देशी दारुची वाहतुक करणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दि. ०३/०३/२०२४ रोजी पाटणसावंगी वार्ड क्र. १ सावनेर येथे मोहाफुल गावठी दारूची विक्री करणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु बाळगुन **आरोपी नामे– १) रामकुमार बाबुराव गजरे, वय ४० वर्षे रा. छोटा पुलीया जवळ सावनेर, २) सोमेश्वर रामचद्र कामळी, वय ४३ वर्षे रा. बाजार चौक पाटणसावंगी ता. सावनेर** असे एकुण ०२ आरोपी हे मोहाफुलाची गावठी दारू प्लास्टीकच्या डबकीमध्ये बाळगुन विक्री करतांना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून एकुण मोहाफुल गावठी दारु ६० लिटर किंमती ३०००/–रु असा एकुण ३०००/–रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. ०२ आरोपी विरुद्ध पो.स्टे सावनेर येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे महिती मिळाली की, पाटणसावंगी शिवार बी एस एन एल ऑफीस जवळ बजाज पल्सर मो.सा. क्र. एम.एच. ४०/ बी. डब्लु.– ९९२९ ने दारूची अवैध वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून गाडी क्र. एम.एच. ४० बी. डब्लु. ९९२९ ने अवैद्यरित्या दारू वाहतूक करणाऱ्या दोन इसमांना नाकाबंदी केली असता **आरोपी नामे–१) मिथिलेश जयराम सलामे वय २८ वर्षे रा. टाकळी ता. सावनेर २) हंसलाल बाबुलाल कुंमरे वय ५० वर्षे रा. आदर्श नगर पाटनसावंगी ता. सावनेर** यांच्या ताब्यातून विनापरवाना व अवैधरीत्या १) देशी संत्रा नं.– १, १८० एम. एम. च्या एकुण ९६ प्लास्टीकच्या निपा एकुण ११८० एम. एल. प्रत्येकी किंमती ७०/– रू प्रमाणे ६७०० रू. २) देशी संत्रा नं. १, ९० एम. एम. च्या एकुण २०० प्लास्टीकच्या निपा प्रत्येकी किंमती ३५ रू प्रमाणे ७०००/– रू. ३) बजाज पल्सर मो.सा. क्र. एम.एच. ४० बी. डब्लु. ९९२९ कि. ८०,०००/– रू असा एकुण ९३००० रूपयाचा मुद्देमाल मिळून आला. पो.स्टे. सावनेर येथे आरोपींविरुध्द कलम ६५ A महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर, सहायक पोलीस निरीक्षक मंगला मोकासे, पोलीस हवालदार रवि मेश्राम, राजेश हावरे, रविंद्र चटप, पोलीस नायक कपोल तभाने, पोलीस अंमलदार दाउद मोहम्मद, अंकुश मुळे, सतिश देवकते यांनी केली.

## प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची विक्री करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक ०३/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील पहलेपार येथे चंद्रशेखर हेमराज बासोटीया रा. पहलेपार सावनेर त्याचे घरी किराणा दुकानात प्रतिबंधित सुगंधित गुटखा ठेवलेला असुन तो बाळगुन त्याची विक्री करतो. अशा गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या बातमीवरुन मा. श्री. अनिल मस्के, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शना खाली API भस्मे व स्टॉफ सह रेड केली असता आरोपीचे घरी किराणा दुकानाची झडती घेतली असता अवैध्यरित्या प्रतिबंधित सुगंधित गुटखा एकुण १३.५७३ कि. ग्रॅम एकुण किंमती ५०,३९९/– रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने व **आरोपी श्वेतल सुभाष काठोडे रा. सौसर मध्यप्रदेश** याचे कडुन खरेदी केल्याने अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती एस. व्हि. बाभरे यांना पोलीस स्टेशन ला बोलावून फिर्याद घेवुन दोन्ही आरोपी विरुध्द अप. क्र. २३३/२४ कलम ३२८,२७१, २७३, १८८ भादवी सहकलम २६(१), २६(२)(iv), २७(३)(e), ३०(२), ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) मा. श्री. अनिल मस्के, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शना खाली API भस्मे व स्टॉफ सह केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर